ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 10 | JUNE - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# लेणी स्थापत्य कला



प्रा.डॉ रविराज नामदेव कांबळे
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,पंढरपूर
जि.सोलापूर.

## ● प्रस्तावना :-

कला किंवा कलावस्तू, संगीत, नृत्य, नाटय इत्यादी कला, स्थापत्य हे भारतीय संस्कृतीचे महत्वाचे घटक आहेत. कला आणि स्थापत्य/वास्तू प्रकार हे मानवाने स्वतः निर्मिलेले आहेत. नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करुन मानवाने स्वतः निर्मिती केलेली आढळते. या निर्मिती मधून मानवाची भावना-प्रतिभा यांचे प्रगटीकरण होत असते. कला व स्थापत्याच्या अभ्यासावरुन आपल्याला त्या मानवसमूहाची प्रगती, तंत्रज्ञान, आचारविचार, सौंदर्यदृष्टी, इतर समूहाशी असलेले संबंध, ताकालीन उद्योगधंदे यांची माहिती मिळते. अशा अभ्यासाचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे भारतातील सिंधू संस्कृतीचे कला अवशेष व स्थापत्य होय.[१]

## ● कला म्हणजे काय?

कलाही मानवाच्या आवडीचा विषय आहे. मानवीजीवनाच्या सर्वोत्कृष्ट साधनांचे रुप कलेच्या माध्यमाने प्रकट होते. मानवी जीवनात जे सुखद आणि आनंददायी अनुभव मिळालेले असतात, तेच कलेच्या माध्यमातून प्रकट होतात. कलाही कलाकराच्या आंतरिक भावना, अनुभव, विचार व कल्पनेवर अवलंबून असते. स्थापत्य, वास्तू, काव्य, शिल्प, चित्र, नाटय, संगीत इत्यादी प्रकारांना 'कला'असे अभिधान आहे.

इंग्रजीत कलेसाठी आर्ट हा शब्द उपयोजिला जातो. मुळात 'अर' या धातुपासून हा शब्द साधलेला असून त्याचा अर्थ बनविणे, उत्पन्न करणे असा आहे.

- "ईश्वराच्या कर्तृत्वशक्तीचा जो अविष्कार आपल्याला पहावयास मिळतो तीच कला होय." - भोजराज
- "आत्म्याची अभिव्यक्ती म्हणजे कला होय." - महात्मा गांधी.

## ● कलेचे हेतू :-

कला ही केवळ इंद्रिय सुखासाठी नाही, तरी श्रीमंतांनी उपभोगावयाची ऐष - आरामाची वस्तु नाही किंवा ती एक करमणूकीचे साधनही नाही. कलेचे लक्ष्य किंवा हेतू यापेशाही उच्च आहे कलेचे हेतू पुढील प्रमाणे आहेत.

१) आत्मविष्कार
२) अनुकरण
३) कलेसाठी कला
४) यश, सेवा, आनंद किंवा मनोविनादेन
५) मानवाच्या प्रगतीसाठी कला
६) भारतीय कलाही आदर्शवादी प्रतिकत्मक आहे.

## ● कलेची वैशिष्टये :-

१) कला ही रसिकाला स्थलकालाच्या बंधनापलीकडे नेऊन सोडते.
२) कला ही क्षणिक अस्तित्वाच्या घटनांना चिरंतनत्व प्राप्त करुन देते.
३) कला ही मानवी जीवन समृध्द बनविते.

४) कलाही मानवी भावनांचा समतोल साधते.
५) कला ही जीवनाला परिपूर्णता आणते.

- **कलेचे प्रकार :-**

सर्वसाधारणपणे कलेचे ६४ प्रकार प्रसिध्द आहेत. शुक्रनीती, काही तंत्रे व कामसूत्र इत्यादी ग्रंथात ६४ कलांची नांवे देण्यात आलेली आढळतात. त्यामध्ये वास्तुकला, शिल्पकला, चित्रकला, संगीतकला व काव्यकला या महत्वाच्या समजल्या जातात. वास्तुकला या कलेच्या वास्तुकला काढणे प्रकारामध्ये घरे, राजवाडे, लेणी व मंदिरे या वास्तूंचा समावेश होतो.[२] मौर्य काळात डोंगर खोदून वास्तू बनविण्याची नवीन कला किंवा प्रकार अस्तित्वात आला अशा वास्तूना शैल्यगृह, गिरीशिल्प असे म्हणतात.[३]

- **लेणी स्थापत्य कला :-**
- **लेणी :-** लेणी म्हणजे डोंगरातील गुहा. या निसर्गातःच तयार झालेल्या असतात. तसेच मसनवाने खोदून काढलेल्या असतात. त्याचे खोदकाम हेसुध्दा एक शास्त्रच आहे.
- **स्थापत्य :-** स्थापत्य म्हणजे स्थापन केलेले - तयार केलेले वास्तु निवारा या संदर्भात हा शब्द वापरला जातो. बांधकाम हा अगदी बोली भाषेतील अर्थ सांगता येईल. बांधकाम कसे करावे, त्यासाठी कोणत्या वस्तू वापराव्यात. मोजमापे, तंत्र यासंबंधीचे शास्त्र म्हणजे स्थापत्यशास्त्र. हे एक पूर्ण विकसित झालेले शास्त्र आहे. भारतात स्थापत्याची विशेष परंपरा शेकडो वर्षापासून आहे. प्रागैतिहास काळापासून वास्तुनिर्मिती होत होती. त्या काळातील मानवाने स्वतः साठी जो निवारा बांधला तो एक स्थापत्याचाच प्रकार होता. पुढे जस-जशा गरजा वाढल्या तसतसे वास्तूत बदल होत गेले. बांधकामाची नियमावली तयार झाली. शास्त्र तयार झाले. बांधकामाचा अनुभव, बदल, तंत्रातील प्रगती यामुळे आजपरिपूर्ण स्थापत्य आपल्याला पाहावयास मिळते.
- **स्थापत्याचे प्रकार :-** १) धार्मिक स्थापत्य २) इतर स्थापत्य

**१)धार्मिक स्थापत्य :-** धार्मिक हेतूसाठी जे स्थापत्य निर्माण झाले ते धार्मिक स्थापत्य देवमूर्तीची स्थापना, पूजाअर्चा, इतर कर्मकांड यासाठी जी वास्तू स्थापत्य निर्माण झाले ते या प्रकारात मोडते. प्राचीन भारतात हिन्दू, बौध्द, जैन या धर्मियांनी अशा वास्तू निर्माण केलेल्या आहेत.
**२) इतर स्थापत्य :-** मानवासाठी उपयुक्त पडेल असे जे स्थापत्य असते ते या दुसऱ्या प्रकारात मोडते. उदा - किल्ले, राजवाडे, जलाशय कालवे, रस्ते, संरक्षक भिंती इ.

स्थापत्याचे आणखी एक वर्गीकरण केले जाते ते तंत्रज्ञानाच्या मुद्यावरुन वास्तू निर्माण करताना तंत्र कोणते वापरले आहे हे पाहिले जाते. त्यानुसार १)बांधीव स्थापत्य २)खोदीव/कोरीव स्थापत्य असे प्रकार पडतात. लेणी स्थापत्य हा कोरीव स्थापत्याचा प्रकार आहे.

- **लेणी स्थापत्य :-** प्राचीन भारतात मौर्य काळात आणि नंतर शुंग काळात बौध्द धर्माशी निगडीत शिल्पकला व स्थापत्यशास्त्र यांचा विकास झाला. यातील प्रमुख स्थापत्य प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

१)स्तूप २)चैत्यगृह ३) विहार. या स्थापत्य प्रकाराचे पुन्हा वेगळे वर्गीकरण करता येईल. १)बांधीव २)खोदीव ३)कोरीव.
**१)स्तूप :-** बौध्द धर्माशी संबधित असलेला आणखी एक वास्तू प्रकार प्रचलीत होता. तो म्हणजे स्तूप होय. स्तूप म्हणजे एखाद्या महापुरुषांची विशिष्ट आकाराची समाधी होय. इतिहासपूर्व काळात मृत व्यक्तीच्या शरीराचे दफन केल्यावर त्या अवशेषांवर मातीचा किंवा दगडांचा ढिगारा करण्याची प्रथा होती. यामधून स्तूपाचा विशिष्ट आकार उत्क्रांत झाला. स्तूप या वास्तूचे मूळ स्वरूप अगदी साधे होते. दफनावर असलेला मातीचा ढिगारा हे त्याचे मूळ स्वरुप होते. सम्राट अशोकाने अनेक ठिकाणी स्तूप बांधले. गौतम बुध्दाच्या जीवनात महत्वाचे प्रसंग ज्या-ज्या ठिकाणी घडले त्या-त्या ठिकाणी स्तूप बांधण्यात आले. मध्यप्रदेशातील प्राचीन विदीशा नगरापासून ९ कि.मी अंतरावर असलेल्या सांची येथे अशोकाने बांधलेला महास्तूप जगप्रसिध्द आहे.

माती, विटा व दगडांनी बांधलेला एक गोलाकार ढिगारा हे स्तूपाचे प्राथमिक स्वरुप आहे. या ढिगाऱ्याच्या मध्यभागी स्मारक रुप वस्तू किंवा महापुरुषाचे शरीरावशेष ठेवीत.[४]

**स्तूपांचे प्राचीन रुप :-** प्रागैतिहासिक काळात मृत व्यक्तीचे स्मारक करण्याची प्रथा होती. पुरातत्वज्ञांनी केलेल्या उत्खननांमध्ये निरनिराळया काळखंडातील आणि निरनिराळया ठिकाणी मृत व्यक्तींची दफने, स्मारके मिळालेली आहेत. पूर्वजांची स्मृती जतन करणे, त्यांची पूजा करणे हा त्या त्या समाजातील धार्मिक परंपरेचा भाग झाला तसेच मृत्यूनंतर मानवाला जीवन असते. त्या जीवतात उपयोगी पडणाऱ्या वस्तू येथूनच त्याला पुरावे उत्खननात सापडले आहेत. द्यावयाच्या अशी ही समजुती त्या काळात प्रचलित होती. त्यावेळी मृत शरीर दोन किंवा तीन मृद्‌भांडयात ठेवून ती मृद्‌भांडी जमिनीत पुरत असत. व याच्या भोवती मृताच्या वस्तू ठेवल्या जात. दफनस्थळाची ओळख पटावी म्हणून अशी शिला वर्तुळे केलेली असत. मृतव्यक्तीच्या दफनावर तयार केलेला मातीचा (स्तूपाचे) ढिगारा हे अगदी प्राथमिक स्वरुप होय.

स्तूपाला महत्व मिळाले ते बौध्द धर्मियामुळे भगवान बुध्दांच्या महापिनिर्वाणानंतर (इ.स.पूर्व - ४८३) त्यांच्या शरीर अवशेषांवर आठ ठिकाणी स्तूपनिर्मिती झाली. बौध्द धार्मिक साहित्यात तसे उल्लेख आहेत आणि प्रत्यक्ष स्थानांवर स्तूप, स्तूपांचे अवशेष पुरातत्वज्ञांना मिळाले. त्या स्तूपांचे वेळोवेळी नूतनीकरण केले गेले.

सामान्यपणे स्तूपाचे अंड, (घुमटाकार भाग), अवशेष पेटी, हर्मिका, यष्टी, छयावली वेदिका, प्रदक्षिणापथ, तोरणे असे प्रकार आहेत.[३]

- **अंड (घुमटाकार भाग) :-** हे स्तूपाचे मुख्य अंग होय, ढिगाऱ्याच्या मध्यभागी स्मारकरुप वस्तू किंवा महापुरुषांचे शरीरावशेष ठेवीत. या ढिगाऱ्याला अंड म्हणतात. याचा पाया पूर्ण वर्तुळाकार असतो परंतु वरचा आकार अर्धवर्तुळाकार असतो. दगड, मातीयापासून आकार तयार केलेला असतो.
- **अवशेष पेटी :-** गौतम बुध्दांचे शरीरवशेष पेटीमध्ये किंवा करंडका मध्ये ठेवून ती पेटी अंडाच्या मध्यभागी ठेवलेली असते. नंतरच्या काळात गौतमबुध्दाच्या शिष्यांच्या शरीर अवशेषांवरुनसुध्दा स्तूप निर्माण केले गेले.
- **हर्मिका :-** ढिगाऱ्याच्या माथ्यावर एक चौरसाकृती पेटी असे त्याला हर्मिक म्हणत अंडाच्या माथ्यावर मध्यभागी चौरसकृती पेटी असते भोवती कठडा असतो त्याला हर्मिका असे नाव आहे.
- **यष्टी :-** हर्मिकेच्या मध्यात लाकडी खांब ठेवलेला असतो त्याला यष्टी म्हणतात.
- **छयावली :-** यष्टीला मोठया पानाप्रमाणे आकार असलेली धातूची किंवा लाकडाची छत्रांची रचना केलेली असते. शिवाय यष्टीच्या टोकावरही छय असते. या सर्व छत्रांना मिळून छत्रावली म्हणतात.
- **वेदिका :-** स्तूपाच्या सर्व बाजूने थोडे अंतर सोडून कठडा उभारतात त्याला वेदिका असे नांव आहे.
- **प्रदशिक्षणापथ :-** स्तूपाभोवती प्रदक्षिणा घालण्यासाठीच पथ असते. हा पथ कधी स्तूपाच्या जवळ तर कधी थोडे अंतर ठेवून असतो. स्तूप आणि वेदिका यांच्या मध्ये हा प्रदक्षिणा पथ असतो.
- **तोरणे :-**वेदिकेचा जो दगडी / लाकडी कठडा असतो त्याला प्रवेशव्दारे असतात. या प्रवेशव्दारांवर तोरणे असतात.

मौर्य शुंगकाळातील स्तूप असे होते पुढील काळातही हे घटक कायम राहिले बदल झाला तो स्थापत्याच्या -स्तूपाच्या निर्मिती तंत्रात - हे स्तूप बांधीव होते. याच काळात कोरीव स्तूपांची निर्मिती झाली. ते नैसर्गिक टेकडयांवरच्या खडकामध्ये एकसंघ दगडामध्ये कोरुन काढलेले असत. खडक खोदून त्यांना स्तूपाचा आकार दिलेला असे. 'एक पाषाणी स्तूप' असे त्यांना संबोधता येईल. महाराष्ट्रातही लेण्यांमध्ये एकपाषाणी स्तूप खोदले गेले.[३]

- **चैत्यगृहे :-** चैत्यगृहे ही वास्तू बौध्द भिक्यूचे प्राचीन मंदिर असे. चैत्यगृह म्हणजे पूजनीय वस्तूच्या पूजेसाठी, उपासनेसाठी निर्माण केलेली वास्तू. एकाच वास्तूमध्ये पूजनीय वस्तू आणि पूजा करणारे भक्त यांच्यासाठी जागा ठेवलेली असते. बौध्द धर्मास स्तूप हे पूजनीस आहेत. गौतम बुध्दांची प्रतिकरूपाने पूजा म्हणजे स्तूपाची पूजा बौध्द धर्मामध्ये प्रचलीत झाली. असे स्तूप एखाद्या वास्तूत असले की ती वास्तू चैत्यगृह किंवा चैत्यमंदिर म्हणून ओळखले जाई. चैत्यगृहाचे विधान सर्वसाधारणपणे चापाकार आयताकार कृती मंडप आणि रुंदीच्या बाजूला गोलाकार केलेले असते. गोलाकार / अर्धगोलाकार या बाजूला स्तूपाची रचना असते.

थोडक्यात चापाकार मंडप, नासीका व समोर आयताकार ओवरे, गजपृष्ठाकार छप्पर, प्रचंड आकाराचे चैत्य तोरण, छताला अर्धवर्तुळाकार लाकडी व दगडी गोपाने, आतमध्ये चौक, चौकात स्तूप मागच्या बाजूला स्तूप, स्तूपाभोवती प्रदक्षिणामार्ग आणि चौकाच्या भोवती छताला आधार दिलेली अष्टकोणी द्यावे असा चैत्यगृहाचा पदविण्यास[५] व छेद असे.

- **विहार :-** डोंगर खोदून तयार केलेल्या वास्तूचा दुसरा प्रकार म्हणजे विहार ही वास्तू होय. चैत्यगृहा प्रमाणेच बौध्द संघस्थानाची दुसरी आवश्यक बाब म्हणजे विहार ही होय. बौध्द भिक्खूच्या निवासस्थानाला विहार अशी संज्ञा होती. मध्यभागी प्रशस्त मोकळा चौक व त्याभोवती ओळीने लहान-लहान खोल्या असत. प्रवेशव्दाराच्या बाजूस सामान्यपणे मोठी ओरी असत. एकदोन मोठे स्तूप, चापाकार चैत्य, उघडे चौक, त्याभोवती भिक्षक्खूंच्या निवासासाठी लहान-लहान खोल्या. हा विहाराच्या आराखडा अर्थात पदविन्यास सुरुवातीपासूनच कायम असे.[४]

विहार म्हणजे या स्तूपाचे चैत्याचे पूजन करणारे, धार्मिक चिंतन करणारे जे बौध्द भिक्षू होते त्यांच्या निवासासाठी बांधलेल्या वास्तू मगध राज्यात गौतमबुध्दांचे काळात अनेक विहार ठिकठिकाणी बांधले गेले. बौध्द साहित्यात त्यांचे उल्लेख सापडतात.

हया विहारांचा उपयोग भिखूंना जास्त करुन वर्षातून होत असे. पावसाळयाचे चार महिने भिक्षूंना प्रवास करण्याचे बंधन असे. त्यांना वर्षा काळात एक ठिकाणी राहण्याची परवानगी असे म्हणून या काळात आणि भिक्षूंच्या वास्ताव्यात नाव पडले वर्षावास मगधातील अनेक धर्मिकांनी बौध्द धर्माला पाठींबा देण्यासाठी असे विहार बांधले. त्याच बरोबर बरावर टेकडयामध्ये लेणी खोदली, या लेणीण्यामध्येच विहार हाही वास्तु प्रकार खोदला गेला. डोंगर खोदून /पोखरुन गुहा तयार करण्यात आल्या. त्यासाठी स्थापत्यशास्त्र पुरेपूर वापरले गेले. प्रवेशव्दार, चौरस, चापाकृती, विघनाचे मंडप चैत्यगृह असा एकूण पसारा असे याबरोबरच विहार ही खोदले गेले.[५]

- **निष्कर्ष :-**

प्राचीन काळातील बांधीव स्थापत्य हे प्रामुख्याने बांवू, लाकूड, विटा, माती यांच्या साहाय्याने तयार झाले होते. लेणी स्थापत्य / शैल्य स्थापत्य हे बांधीव स्थापत्य प्रकाराचेच प्रतिरुप आहे. विधान, स्तंभ, छप्पर आदी बांधीव स्थापत्याचे घटक लेणी स्थापत्यात त्याच रुपात आहेत. तसेच लाकूड कामाचे तंत्रही तसेच आहे.

उदा. बांधीव स्थापत्यात प्रवेशव्दाराची कमान उभी करताना लाकडी खांब ताण लावून खेचलेल असणि त्या खांबावरची अर्धवर्तुळाकार कमानही अशीच ताणलेली असते. लेणी स्थापत्यातही पहिल्या चैत्यगृहामध्ये हा विशेष जाणवते. जरी लेणी स्थापत्यात लाकूड प्रवेशव्दारासाठी वापरले नव्हते व सर्व स्थापत्य हे शिलाखंडात मध्येच कोरले होते. तर काही लेण्यांच्या प्रवेशव्दारावर लाकडी नक्षीकामही जोडलेले होत. त्याच्या खुणा दिसतात.

उदा:- १)भागे चैत्यगृह - आनील स्तंभ, मुखदर्शनाची कमान इ.

२)भाजे, कार्ले येथील चैत्यगृहाला गजपृष्ठाकार छताला असलेल्या लाकडी तुळया इत्यादी. अत्रे, रायरीकर,केंगळे - महाराष्ट्र संस्कृती - डायमंड पब्लिकेशन्स, पुणे -२००८. पृ.क्र.१११.

- **संदर्भ :-**


१) प्रा.डॉ.शुभांगना अत्रे, प्रा.कल्पना रायरीकर, सौभिम केंजळे - महाराष्ट्र संस्कृती १८१८ पर्यंत, डायमंड पब्लिकेशन्स, पान. क्र.८६.

२) डॉ. अनिल कठारे, प्रा. विजया साखरे - भारतीय केलीचा इतिहास - कल्पना प्रकाशन, नांदेड, जानेवारी -२००८ पृ.क्र.९ ते १८.

३) प्रा.डॉ.शुभंगना अत्रे, प्रा.कल्पना रायरीकर, केंजळे - महाराष्ट्र संस्कृती - पृष्ठ. क्र.१०४-१०७.

४) अनिल कठारे, प्रा. विजया साखरे - भारतीय कलेचा इतिहास , पृष्ठ - २८-२९.

५) अत्रे, रायरीका, केंजळे - महाराष्ट्र संस्कृती, पृष्ठ - १०८.